जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


**-:प्रेस नोट :-**

दिनांक :- ०९/०५/२०२६

# "पुणे शहरातुन सुनेचा खुन करुन फरार झालेल्या आरोपी सासऱ्याला जळगाव स्थानिक गुन्हे शाखेकडुन जेरबंद "

दिनांक 02/05/2026 रोजी पुणे येथील रायकर मळा परिसरात राहणारे आरोपीत नामे भानुदास भास्कर चौधरी यांनी त्यांची सून स्वाती तेजस चौधरी हिचा घरगुती कारणावरून डोक्यात वार करून खून केला. व घराला बाहेरून कुलूप लावून आरोपी पसार झाला होता. घरातील लहान मुलाच्या रडण्याचा आवाज आल्याने शेजाऱ्यांनी ही माहिती स्वाती हिचे पती तेजस भानुदास चौधरी यांना दिली. त्यांनी घरी येऊन पाहिले असता त्यांची पत्नी स्वाती ही रक्ताच्या थारोळ्यात मृत अवस्थेत आढळून आली. सदर प्रकरणी तेजस भानुदास चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड सिटी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. 105/2026, BNS कलम 103(1) प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा घडल्यापासून आरोपी फरार होता. त्याचा ठावठिकाणा लागत नसताना **दिनांक 09/05/2026 रोजी श्री. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांना** गोपनीय बातमीदार मार्फत माहिती प्राप्त झाली की, सदर आरोपी नामे भानुदास भास्कर चौधरी हा जळगाव शहरातील **मेहरूण गाव परिसरातील महादेव मंदिर भागात वास्तवास आहे.** मिळालेल्या माहितीची पडतळणी करत श्री. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास तात्काळ सदर ठिकाणी रवाना करत, सदर ठिकाणाहून आरोपीत नामे भानुदास भास्कर चौधरी हास ताब्यात घेवुन, नमुद आरोपीतांस गुन्हयांचे पुढील तपासकामी नांदेड सिटी पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे पथकच्या ताब्यात देण्यात आले.

**सदरची कामगिरी मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधिक्षक, जळगाव, श्री.संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक,जळगाव परिमंडळ, श्री. नितीन गणापुरे, उप विभागीय पोलीस अधिकारी, जळगाव विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांचे नेतृत्वाखाली पोलीस उप निरीक्षक शरद बागल, सफौ/अतुल वंजारी, पोहेकॉ/विजय पाटील, अकरम शेख, नितीन बाविस्कर, प्रविण भालेराव, मुरलीधर धनगर, पोकॉ/राहूल रगडे, रविंद्र कापडणे, प्रदीप चौरे या पथकाने कौश्यल्यपुर्ण उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**प्रति,**
**सर्व संपादक/वार्ताहार**
**प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया**
**2/- जनहितार्थ प्रसारण करीता**

***************************************************************************************************


स्थानिक गुन्हे शाखा
रेकार्ड रुम
रेकॉर्ड रुम